५.

# प्रेसनोट

## जस्ट डायल या वेबसाईटवरुन विमानाचे तिकिट बुक करण्याच्या बहाण्याने अर्थिक फसवणुक करणा-यास अटक

फिर्यादी संकेत अशोक सदाफळ रा. सहयाद्री ग्राउंडजवळ, शाहू कॉलेज रोड पर्वती पुणे मोबाईल नबर- 9284097574,8530303212

सदर तक्रारी अर्जामध्ये अर्जदार यांनी जस्ट डायल यांना कॉल करुन मॉरिशिअस या टुर्ससाठी बुकिंगकरिता फोनव्दारे चौकशी केली असता, फिर्यादि यांना मिकी सिंग या व्यक्तीचा मो.क्रं-9834322549 , 9607716091 याव्दारे कॉल येवून तिकिट बुक केले तसेच फिर्यादि यांना तिकिट बुक झाल्याचा एअरपोर्ट वरुन ईमेल आला व फिर्यादि यांनी तिकिट बुक झाल्याचे खात्री केली. त्यानंतर फिर्यादि यांनी गैरअर्जदार यांच्या आयसीआयसी बॅक खाते क्रमांक-293601500572 आयएफसी कोड-आयसीआयसी 0002936 या बॅक खॉत्यात एकूण रक्कम -99000/- रु जमा केली त्यांनंतर गैरअर्जदार यांनी सदरचे तिकिट कॅन्सल करुन तिकिट ाचे पैसे वापरुन फिर्यादि यांना सदरचे पैसे देण्यास टाळाटाळ करुन फोन बंद केले त्यामुळे तक्रारदार यांची आर्थिक फसवणूक झाल्याने त्यांनी इकडील कार्यालयात तक्रारी अर्ज दिल्याने सदरबाबत दत्तवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं- 142 /2019 भादवि कलम 420 माहिती तंत्रज्ञान कायदा कलम 66 डी 34 अन्वये दि.25/02/2019 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपी यांनी वेगवेगळया ठिकाणी दोन/तीन महिन्यासाठी प्लॅट भाडयाने घेवून सदरील प्लॅट मालकांना प्लॅटचे भाडे न देता आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे तसेच एका प्लॅटमधील फर्निचर चोरी करुन घेवून गेल्याचे निष्पन्न झाले आहे.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर करत असताना सायबर पोलीस स्टेशन कडील पोलीस उप-निरीक्षक अनिता पवार यांनी दाखल गुन्यातील आरोपीबाबत सखोल माहिती काढुन मिळालेल्या माहितीवरुन आरोपी नामे 1) अर्चना माघाडे हिस पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे व त्यांच्या पथकाने विमाननगर पुणे येथुन ताब्यात घेवुन दत्तवाडी पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात दिले आहे. सदरील आरोपी यांचे कडुन 2 मोबाईल संच इ. मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील कामगिरी पोलीस उप-आयुक्त अर्थिक व सायबर गुन्हे श्रीमती ज्योतीप्रिया सिंग व सहा. पो.आयुक्त निलेश मोरे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि जयराम पायगुडे पोउप-निरीक्षक अनिता पवार पोशि आदेश चलवादी, शाहरुख शेख, राहुल हंडाळ भुषण शेलार, सुनिल निकम, मपोशि पुजा डहाळे, मपोशि शितल वानखडे यांनी केली आहे. तसेच नमुद आरोपी यांनी यापूर्वी अश्या प्रकारचे गुन्हे केले आहे. तरी नागरीकांना आव्हान करण्यात येते की, ज्या नागरीकांना जस्ट डायल या वेबसाईटवरुन मोबाईल क्र-**9834322549**, 923042311,7083364912,9607716091, 9834322549, **आयसीआयसी बॅक खॉते क्रमांक-293601500572** यावरुन बोलत असल्याचे सांगुन जस्ट डायल या वेबसाईटव्दारे विमानाचे तिकिट बुकिंग करण्यासाठी वेगवेगळी अमिष देवुन पैसे भरण्यास सांगुन आर्थिक फसवणुक झाली असेल त्यांनी सायबर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. आरोपीने अश्या प्रकारचे अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न होत आहे.